दि हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई

HINDUSTHAN BANK
दि हिंदुस्थान को.ऑ.बँक लि. मुंबई

**The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai**

HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD., OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 022-35013800
Email : support@hindusthan.bank.in • Website : www.hindusthan.bank.in

# 56 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

## (फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची 56 वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक 19.09.2026 रोजी दुपारी 3.30 वाजता कै.स्मिता सामंत सभागृह, शांताराम कृष्णाजी पंत वालावलकर माध्यमिक विद्यालय, डेअरी रोड, नेहरुनगर, कुर्ला (पू), मुंबई 400 024 येथे खाली दिलेल्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

## ∴ सभेपुढील विषय ∴

1. दिनांक 13 सप्टेंबर, 2025 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.
2. संचालक मंडळाने सादर केलेला दिनांक 31 मार्च, 2026 अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालास तसेच वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास मंजुरी देणे.
3. सन 2025-2026 या सहकारी वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
4. सन 2024-2025 च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
5. सन 2026-2027 या सहकारी वर्षाकरिता बँकेच्या संचालक मंडळाने अंतर्गत तसेच कंकरंट लेखापरिक्षकांची नेमणूक केली आहे, त्यास अंतिम मान्यता देणे.
6. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफ्याच्या विभागणीस मान्यता देणे.
7. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार सन 2026-2027 या सहकारी वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांच्या पुनर्नियुक्तीस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार मंजुरी देणे.
8. सन 2025-2026 या सहकारी वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या उत्पन्न व खर्चास तसेच संचालक मंडळाने सुचविलेल्या सन 2026-2027 च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
9. महाराष्ट्र शासनाच्या "एक रकमी परतफेड योजने" अंतर्गत सवलत दिलेल्या थकित कर्ज खात्यांची माहिती घेणे व संचालक मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.
10. बँकेच्या मानखुर्द व वडाळा शाखेमधील इंटेरीअर/फर्निचर/सिव्हील/इलेक्ट्रिकल इत्यादी कामांस व बिलांस मंजुरी देणे.
11. सन 2026-2027 मधील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमास मंजुरी देणे व गतवर्षीचा आढावा घेणे.
12. उपविधीनुसार किमान भाग भांडवल धारण करीत नसलेल्या सभासदांचे सभासदत्व रद्द करुन भाग रक्कम राखीव निधी खाती जमा करणेबाबत निर्णय घेणे
13. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
14. मा.अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : 04.09.2026
मुंबई

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**सुनिल सदाशिव पटवर्धन**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## -: विशेष सुचना :-

1. गणसंख्येअभावी सदर सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
2. कोणत्याही सभासदास अहवालासंदर्भात काही माहिती हवी असल्यास अशा सभासदांनी दिनांक 10 सप्टेंबर 2026 पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत लेखी कळविणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहिती पुरविणे सुलभ होईल. आयत्या वेळी विचारलेले प्रश्न स्वीकारणे बंधनकारक राहणार नाही.
3. सभेस येताना सभासदांनी नोटीस प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.
4. ज्या सभासदांनी रु.1,000/- पेक्षा कमी रकमेचे भाग भांडवल घेतले आहे, त्यांनी आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन किमान 40 शेअर्सची (एकूण रु.1,000/- पर्यंत) रक्कम लवकरात लवकर पूर्ण करावी. यापुर्वी सभासदांस वारंवार कळविण्यांत येऊन देखील ज्या सभासदांनी या बाबींची पुर्तता केलेली नसल्याने बँकेच्या उपविधीनुसार भागभांडवल पुर्ततेअभावी सभासदत्व कायम ठेवण्याची जबाबदारी संबंधीत सभासदांची असेल याची नोंद घ्यावी.
5. सभासदांनी आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा.
6. सभासदांनी आपल्या वारसाची नोंद केलेली नसल्यास ती करुन घ्यावी.
7. ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील, त्यांनी ते बँकेच्या मुख्य कार्यालय/ शाखा कार्यालयातून घेऊन जावेत.
8. सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत जवळची शाखा किंवा मुख्य कार्यालय येथून उपलब्ध करुन दिली जाईल तसेच बँकेच्या www.hindusthan.bank.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
9. शैक्षणिक गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या भागधारकांच्या पाल्यांचा सत्कार दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात येतो. खालीलप्रमाणे गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या आपल्या पाल्यांची नावे त्यांच्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित प्रतीसह दिनांक 10 सप्टेंबर 2026 पर्यंत जवळच्या शाखेत अथवा मुख्य कार्यालयात कळवावी, त्यानंतर येणाऱ्या नावांचा विचार केला जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| 1) | एस.एस.सी. (10 वी) | 75% व त्यापेक्षा जास्त |
| 2) | एच.एस.सी. (12 वी) | 70% व त्यापेक्षा जास्त |
| 3) | पदवीधर तसेच पदव्युत्तर व तत्सम परीक्षा | 65% व त्यापेक्षा जास्त |